मराठवाड्याच्या आर्थिक व शैक्षणिक विकासात सामाजिक न्याय व विशेष अर्थ सहाय्य विभागाची भूमिका विशेष संदर्भ नांदेड जिल्हा (कालखंड 2010 - 2020)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सापाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत
अर्घशास्त्र या विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर संशोधनाचा सारांश

संशोधक

स्वामी शिवशंकर मलिकर्जून

एम. ए (अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. ठाकुर विलास तुळशीराम

एम, प अर्थ शास्त्र) रोट, पीएचडी

श्री शिवाजी कॉलेज कंधार जी. नंदिड

2021- 22

मराठवाड्याच्या आर्थिक व शैक्षणिक विकासात सामाजिक न्याय व विशेष अर्थ सहाय्य विभागाची भूमिका विशेष संदर्भ नांदेड जिल्हा (कालखंड 2010 - 2020)

प्रस्तावना,

सामान्यता फार पूर्वीपासून भारतीय समाजरचनेतील चातुर्वर्ण्य व्यवस्था व जातिव्यवस्थेमुळे समाजातील दुर्बल घटक मागासवर्गीयांना विशेषता अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीस अनेक वर्षापासून सामाजिक आर्थिक राजकीय शैक्षणिक अशा सामूहिक उद्यापासून तसेच नागरी व मूलभूत हक्क व अधिकारापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवण्यात आले. भारतातील धर्म सत्तेने आणि अनिष्ट रूढी परंपरा ने समाजातील विशिष्ट व ठराविक अशा उच्चवर्णीयांना राज्य सत्तेचा उपभोग न्याय ध्यान शिक्षण घेणे संपत्ती संपादन अर्थार्जन करणे इत्यादी कार्याची मालकी हक्क व अधिकार बहाल केले. समाजातील दुर्बल घटकांना यापासून हेतुपूर्वक दूरच ठेवण्यात आले याचा परिणाम म्हणून भारतीय समाज रचनेत सामाजिक आर्थिक राजकीय शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात विषमता दिसून येते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समता आणि बंधुता या मूलभूत मुख्य संकल्पनेवर आधारलेले राज्यघटनेचा 26 जानेवारी 1950 रोजी स्वीकार केला तेव्हापासून भारत एक स्वातंत्र्य सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक गणराज्य म्हणून उदयास आले. भारताने समाजवादी समाज रचनेचा पुरस्कार करून कल्याणकारी राज्याची संकल्पना मान्य केली या संकल्पनेवर आधारित व भारताची निर्मिती करण्यासाठी समाजातील तळागाळातील दुर्बल घटकांचा मागासवर्गीयांचा जोपर्यंत सर्वांगीण विकास होत नाही तोपर्यंत कल्याणकारी राज्याची संकल्पना साकार होऊ शकणार नाही या बाबीची पुरेपूर

कल्पना आपल्या घटनाकारांना होती त्यामुळे त्यांनी दुर्बल घटकातील विशेषता अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती भटक्या जाती विमुक्त जाती यांच्या सामाजिक आर्थिक शैक्षणिक हीच संबंधीची जपणूक व संरक्षण करण्यासाठी तसेच सामाजिक आर्थिक अन्याय व सर्व प्रकारच्या शोषण व पिळवणूक इ पासून तिचे संरक्षण करण्यासाठी त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी खास घटनात्मक तरतुदी केल्या आहेत.

प्रत्येक भारतीयाला शिक्षणाचा अधिकार आहे दिशा दाखविणारी काही पायाभूत मुलतत्वे अशी आहेत की कमीत कमी पूर्व प्राथमिक व प्राथमिक वर्गांना शिक्षण विनामुल्य असावे कारण सर्वांना प्राथमिक शिक्षण हे फार गरजेचे आहे शैक्षणिक क्षेत्रातल्या चिंतेच्या दोन मुख्य बाबी म्हणजे शिक्षणातून मिळणारा कमी दर्जाचा परिणाम आणि मुळातच कमी दर्जाचे शिक्षण उदाहरणात विकसनशील देशांमधल्या प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता पहिलीत नाव घालणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी शेवटच्या इयत्तेपर्यंत पोहोचणाऱ्यांची संख्या 60 टक्के देखील नसते. शिवाय कित्येक देशांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांचे प्रमाण 40 टक्के पेक्षा जास्त असते तर कित्येक प्राथमिक शिक्षकांना चे शिक्षण घेण्याची पुरेशी संधी किंवा पात्रता नसते.

भारतीय राज्यघटनेनुसार शिक्षण हा विषय केंद्र शासन व राज्य शासन यांच्या सामायिक यादीत असल्यामुळे ती त्यांची सामायिक जबाबदारी ठरते शालेय शिक्षणाकरिता मध्यमवर्गीयांसाठी अल्प शुल्काच्या अनुदानित शाळा आणि त्याच्या खालोखाल मोफत शिक्षण पण देणाऱ्या स्थानिक प्रशासनाने चालविलेल्या शाळा अशी व्यवस्था असते.

सामाजिक न्याय व्याख्या-

समाज मान्य मूल्यावर अधिष्ठित असलेली न्यायाची संकल्पना म्हणजे सामाजिक न्याय सामाजिक न्याय ही नितीमूल्य यावर आधारलेली संकल्पना आहे,
सामाजिक न्याय ही संकल्पना सर्वप्रथम 1,500ते 2,500 वर्षापूर्वी जुडाई जन्म ख्रिश्चन इस्लाम धर्म बौद्ध धर्म हिंदू धर्म इत्यादींच्या शिकवणुकीतून उदयास आली.

बहुजनांचे कैवारी- डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राजर्षी शाहू महाराज महात्मा फुले महात्मा गांधी या सर्वांनी बहुजनांचा उद्धार दुर्बल घटकांचा उद्धार समाजातील अल्पसंख्यांक मागासवर्गीय इत्यादींच्या कल्याणासाठी अहोरात्र कष्ट घेतले.

1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर समाजकल्याण विभागाची स्थापना प्रत्येक जिल्ह्यात करण्यात आली 1992 मध्ये समाज कल्याण मधून आदिवासी कल्याण विभाग तर 1991 मध्ये महिला व बाल विकास विभाग वेगळा करण्यात आला. यानंतर 2000 मध्ये समाज कल्याण विभाग आतून विमुक्त जाती भटक्या जाती इतर मागास व विशेष मागास वर्ग कल्याण विभाग वेगळा करून सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य हा स्वतंत्र विभाग सुरू झाला आहे. याचे आयुक्त समाज कल्याण आयुक्तालय पुणे येथे असून यांच्या नियंत्रणाखाली मुंबई पुणे नाशिक औरंगाबाद अमरावती व लातूर ते 6 प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग आहेत.

मराठवाड्यातील वंचित दुर्बल घटक यांच्या शैक्षणिक स्थितीवर प्रकाश टाकणारे संशोधन फार कमी प्रमाणात आहे मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील या घटकांचे शिक्षणातील प्रमाण फार कमी आहे. दुर्बल वंचित घटकांच्या पालकांमध्ये कमालीची निरक्षरता दिसून येते हे घटक गरिबी दारिद्र्य अज्ञानामुळे शिक्षण घेत नाही शिक्षणामुळे आपल्या आर्थिक सामाजिक विकास होतो हे त्यांच्या लक्षात येत नाही या अशा प्रवर्गासाठी विविध संधी निर्माण करण्यासाठी सामाजिक न्याय विभागांतर्गत जुना वरील खर्च आवश्यक आहे. खर्चाचा परिणाम शैक्षणिक विकासावर कितपत होतो या योजना राबवत असताना कोणकोणत्या अडचणी येतात यांचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची करण्यात आली.

संशोधन समस्या:-

भारतीय संविधानातील कलम 46 मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार दुर्बल घटक विशेषता अनुसूचित जाती जमाती यांच्या शैक्षणिक सामाजिक आर्थिक विकासासाठी साठी शासन प्रयत्नशील असायला पाहिजे कल्याणकारी स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शासनामार्फत पूर्णत समाजाच्या प्रगतीबरोबर समाजातील दुर्बल घटक अल्पसंख्यांक मागासवर्गीय अपंग महिला इत्यादींच्या कल्याणासाठी प्रयत्न करणे हे शासनाचे आद्य कर्तव्य आहे परंतु तसे दिसून येत नाही.

मराठवाड्याच्या संदर्भात विचार केला तर या ठिकाणची की कोणी परिस्थितीतील शैक्षणिक सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव मोठ्या प्रमाणात दारिद्र्याचे प्रमाण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे वाढते प्रमाण आर्थिक व औद्योगिक दृष्ट्या मागासलेपणा शिक्षणात मोठ्या प्रमाणात तर समतोल दिसून येतो. मराठवाड्याचे 2011 मध्ये साक्षरतेचे प्रमाण बघितले तर 76.38 टक्के इतके आहे. महाराष्ट्राचे 82.91टक्के आहे म्हणजे अजूनही मराठवाड्यात 23.61टक्के लोक निरक्षर आहेत.

त्यामुळे अजूनही वंचित आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या आर्थिक विषमतेत वाढ होऊन त्यांच्यामध्ये आर्थिक व सामाजिक समस्या निर्माण होत आहेत त्यांच्यात होणारे शैक्षणिक नुकसान तपासणे हा या संशोधकाचा हेतू आहे त्यासाठी या घटकांच्या आर्थिक व सामाजिक समानता व न्याय यावर कोणता परिणाम झाला आहे हे मूल्यमापन करण्याच्या हेतूने संशोधकाने मराठवाड्याच्या आर्थिक व शैक्षणिक विकासात सामाजिक न्याय विभागाचे भूमिका विशेष संदर्भ नांदेड जिल्हा या समस्येची निवड करून त्यातून उपाय व शिफारशी सुचविण्यासाठी संशोधकाने या विषयाची निवड केलेली आहे

संशोधनाची उद्दिष्टे:-

1- सामाजिक न्याय विभागांतर्गत राबविल्या जाणाऱ्या शैक्षणिक योजनांचा अभ्यास करणे.

2- सामाजिक न्याय विभाग निहाय शिक्षणावरील खर्चाचा अभ्यास करणे.

3- सामाजिक न्याय विभागाच्या ध्येय व धोरणांचा अभ्यास करणे.

4- सामाजिक न्याय विभागाच्या शिक्षणावरील खर्चाच्या परिणामाचा अभ्यास करणे.

5- सामाजिक न्याय विभागांतर्गत शैक्षणिक योजना विकासातील अडचणी लक्षात घेऊन शिफारशी सुचविणे.

गृहितके:-

1- सामाजिक न्याय विभागाचे शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण वाढले आहे आहे परंतु लाभार्थी विद्यार्थ्यांचे प्रमाणे वाढले नाही.

2- सामाजिक न्याय विभागाच्या शिक्षणावरील खर्चामुळे आहे ती ग्रहावरील खर्चाचे प्रमाण अधिक आहे.

3- सामाजिक न्याय विभागाच्या शैक्षणिक योजना मुळे मागास वर्गीय वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध होत आहेत.

4- सामाजिक न्याय विभागाच्या सर्वच योजनांची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही.

5- सामाजिक न्याय विभागाच्या शैक्षणिक लाभ घेण्यात विद्यार्थी उदासीन असलेले दिसून येतात.

6- सामाजिक न्याय विभागांतर्गत योजना राबविण्यात अनेक अडचणी आहेत.

संशोधनाचे महत्त्व:-

संशोधन ही प्रगतीची जननी असल्यामुळे संशोधन समाज उपयोगी नसेल तर समाजाची प्रगती होऊ शकत नाही. त्यामुळे संशोधनासाठी निवडलेला "मराठवाड्याच्या आर्थिक व व शैक्षणिक विकासात सामाजिक न्याय विभागाची ठिकाण विशेष संदर्भ नांदेड जिल्हा" हा विषय सामाजिक न्याय विभागांतर्गत दिल्या जाणाऱ्या योजना व प्रकाश टाकण्याच्या दृष्टिकोनातून सोडून गेला आहे आहे.

एका बाजूने नांदेड जिल्ह्यातील दुर्बल वंचित घटकांच्या शैक्षणिक विकासातील सामाजिक न्याय विभागाचे योगदान अभ्यासताना विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमल बजावणीत येणाऱ्या समस्यांचाही अभ्यास करणे महत्वाचे आहे. त्यामुळे समाजकल्याण विभागांतर्गत येणारी वस्तीग्रह हे शासकीय निवासी शाळा शाळा आश्रम शाळा सद्यस्थितीचा अभ्यास कर पुणे शेक्षणिक दर्जा यावर प्रकाश टाकू आणि सामाजिक न्याय विभागांतर्गत केल्या जाणाऱ्या खर्चाच्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

अध्ययनाची व्याप्ती व मर्यादा:-

संशोधनाची व्याप्ती;

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे मराठवाडा, विशेष संदर्भ नांदेड जिल्हा पुरते मर्यादित आहे. या जिल्ह्यातील सामाजिक न्याय विभाग या एका विभागांतर्गत येणाऱ्या योजनांच्या खर्चाचा अभ्यास व परिणाम यांचे अध्ययन करण्यात येणार आहे.

संशोधनाच्या मर्यादा:-

1- प्रस्तुत संशोधन हे केवळ मराठवाड्यातिल सामाजिक न्याय विभागात पुरतेच मर्यादित आहे.
2- प्रस्तुत संशोधन केवळ सामाजिक न्याय विभागाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या शैक्षणिक व आर्थिक योजना व खर्च यावर आधारित आहे.
3- संशोधनाचा कालखंड 2010 ते 2020 असा असला तरी काही विशिष्ट काळ अंतराच्या आकडेवारीच विश्लेषण काही ठिकाणी आकडेवारी उपलब्ध नसल्यास करण्यात येईल.

तथ्य संकलन संशोधन पद्धती:-

सामाजिक संशोधन करताना तथ्यांचे संकलन करणे आवश्यक असते तथ्य संकलनाचे दोन प्रकार आढळतात. एक म्हणजे प्राथमिक स्रोत होय व दुसरे म्हणजे दुय्यम स्रोत होईल

*प्राथमिक तथ्य संकलनाचे स्त्रोत-

1- प्रश्नावली- प्राथमिक सत्य संकलन आतील प्रश्नावली हे महत्त्वाचे साधन मानले जाते प्रस्तुत संशोधनासाठी मराठवाडा विभागातील कथा नांदेड जिल्ह्यातील सामाजिक न्याय विभागातील अधिकारी वसतिगृहाचे गृहपाल शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी यांच्याकडून माहिती संकलित करण्यात येईल आहे.

2- निरीक्षण - कच्छ संकलनासाठी प्रत्यक्ष सामाजिक न्याय विभाग वस्तीग्रह निवासी शाळा आश्रम शाळा यांना भेटी देऊन तेथील समस्या उपाययोजनांची परिणाम याविषयी माहिती घेऊन निरीक्षणे नोंदविण्यात येतील.

3- अनुसूची

प्रस्तुत संशोधन मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील विशेष संदर्भ नांदेड जिल्ह्यातील न्याय विभागात अंतर्गत येणाऱ्या प्राथमिक आश्रम शाळेतील लाभार्थी यांच्याकडून अनुसूची द्वारे प्रत्यक्ष प्रश्नावली भरून घेण्यात येतील.

* दुय्यम तथ्य संशोधनाचे स्रोत:-

प्रस्तुत संशोधनात सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची अध्ययन करण्यासाठी दुय्यम स्रोतांचा वापर केला आहे त्यासाठी विविध प्रकारची प्रकाशने कार्यालयीन दस्तऐवज यांचा वापर माहिती पुस्तके यांचाही वापर करण्यात येणार आहे.

: प्रकरणाची योजना :

वस्तू संशोधन करताना सदरील प्रबंध या मधील एकूण सहा प्रकरणे आहेत ती थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1-प्रकरण 1 ले

प्रस्तावना -

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाच्या संदर्भाने प्रस्तावना करून सामाजिक न्याय विभागाचे योगदान व्याख्या या संकल्पना स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत मराठवाड्यातील आर्थिक शैक्षणिक सद्य स्थितीचे वर्णन यात केलेले आहे.

2- प्रकरण दुसरे

संशोधन साहित्याचा आढावा:-

या प्रकरणात या विषयावर या अगोदर कोणी संशोधन केलेले आहे हे त्या संबंधित प्रबंध ग्रंथ संशोधनात्मक लेख विविध समित्यांचे अहवाल नियतकालिके मासिके व वर्तमान पत्रातील लेख या माध्यमातून आढावा घेण्यात आलेला आहे.

3- प्रकरण तिसरे

सामाजिक न्याय संकल्पना रचना व कार्य:-

याप्रकरणात शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रासाठी सामाजिक न्याय विभागाचे योगदान सामाजिक न्याय ची रचना व विविध वंचित व दुर्बल घटकांसाठी सामाजिक न्यायाचे कार्य काय काय आहे हे अभ्यासणे

4- प्रकरण चौथे-

मराठवाडा आर्थिक व शैक्षणिक स्थिती-

या प्रकरणात मराठवाड्यातील दुर्बल वंचित घटक कोणते आहेत त्याचा अभ्यास करण्यात येईल या घटकांची सामाजिक स्थिती कशी आहे आर्थिक स्थिती चा शिक्षणावर काय परिणाम होत आहे या सर्व बाबींचा विचार करण्यात येईल.

5- प्रकरण 5 वे-

सामाजिक न्याय विभागाच्या आर्थिक व शैक्षणिक विकासाच्या योजना:-

समाजातील वंचित व दुर्बल घटकांचा विकास करण्याकरिता सामाजिक न्याय विभागा अंतर्गत शिक्षण उच्च शिक्षण प्रशिक्षण शिष्यवृत्ती स्वयंरोजगार मागासवर्गीयांसाठी विशेष शाळा सुरु करणे विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करणे खाजगी वस्ती ग्रहाला अनुदान देणे मुलींसाठी उपस्थिती भत्ता सायकलींचे मोफत वाटप तसेच मोफत पुस्तके गणवेश वाटप करणे इत्यादी शैक्षणिक कार्यावर सामाजिक न्याय विभाग खर्च करते.

6- प्रकरण 6 वे:-

सारांश निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात प्रत्येक प्रकरणाचा सारांश मुद्दे निहाय तसेच प्रकरण निष्कर्ष अभ्यास विषयाशी संबंधित समस्या त्या सोडविण्यासाठी मराठी उपाय योजना तसेच शिफारशींचा समावेश इत्यादी घटकांचा समावेश करण्यात येणार आहे.

संदर्भ सूची:-

1- पुनीयानी राम(2010), सामाजिक न्याय एक सचित्र परिचय,वाणी प्रकाशन, नवी दिल्ली.

2- सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग महाराष्ट्र शासन, वाटचाल सामाजिक न्यायाच्या दिशेने पुस्तिका 2009
.

3- खरात शंकर ,,भटक्या विमुक्त जमाती त्यांचे प्रश्न ,,सुगावा प्रकाशन पुणे 2003.

4- काळे भगवान (1988)" मराठवाडा काल आणि आज" संकेत प्रकाशन ,जालना.

5- पवार अशोक "महाराष्ट्रातील आश्रम शाळांची सद्यस्थिती "व '21 व्या शतकातील आव्हाने व योजना ' विकास समर्पित मासिक, सप्टेंबर 2008.